# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## निदेश क्र. २०/२०१९

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणारा (सुधारणा) निदेश, २०१९.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे. (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) (याला अधिनियम असे संबोधण्यात येईल) ;

आणि

**ज्याअर्थी,** वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीसाठी लागू करण्यात आला आहे;

आणि

**ज्याअर्थी,** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणारा निदेश, २०१८ (निदेश क्र. ३७/२०१८) हा दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(८) अंतर्गत निर्गमित केला होता आणि तो दिनांक १०/१२/२०१८ पासून लागू करण्यात आला होता ;

आणि

**ज्याअर्थी,** सदर निदेशामध्ये नमुद असलेला विषय परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८ हा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये परिनियमात रूपांतरित होवू शकला नव्हता ;

आणि

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) च्या परंतुकामध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार निदेश क्र. ३७/२०१८ ची परिणामकारकता दिनांक ०९/०६/२०१९ रोजी आपोआप व्यपगत झाली होती ;

आणि

**ज्याअर्थी**, निदेश क्र. ३७/२०१८ चे रूपांतरण परिनियमात केले जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८ चे नुतनीकरण नवीन निदेशामध्ये केले जाणे आवश्यक झाले होते ;

आणि

**ज्याअर्थी,** निदेश क्र. ३७/२०१८, परिशिष्ट — ठ मधील परिच्छेद १५ अंतर्गत संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ तर्फे सुचित सुधारणेचा समावेश नव्याने प्रसारीत होणाऱ्या गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग ३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षां योजना निर्धारीत करणाऱ्या निदेशामध्ये केला जाणे आवश्यक होते;

आणि

**ज्याअर्थी,** व्यवस्थापन परिषदेच्या सभा दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ च्या सभेतील बाब क्र. ९६ नुसार वर्ग ४ च्या पदभरती संदर्भात झालेल्या ठरावानुसार परिक्षा योजनेमध्ये झालेला बदल निर्धारीत करणाऱ्या निदेशामध्ये केला जाणे आवश्यक होते;

**त्याअर्थी,** मी. डॉ. ना. व्यं. कल्याणकर, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारा अंतर्गत निदेश क्र. ३७/२०१८ चे नुतनीकरण काही दुरुस्तीसह निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला **''गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या आस्थापनेवरील पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या सरळसेवा भरतीसाठी आयोजीत करावयाच्या लेखी चाचणी परीक्षां आणि पद वर्ग**

**३ साठी संगणकीय चाचणी परीक्षा, त्यांचा अभ्यासक्रम आणि चाचणी परीक्षा योजना निर्धारीत करणारा निदेश, २०१९''** असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्या तारखेपासून लागू असेल.

३. निदेश क्र. १९/२०१९ मधील तरतुदींच्या अधिन राहून पद वर्ग १ च्या सरळसेवा पदभरतीसाठी लेखी चाचणी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट — अ ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.
या परिशिष्ट — अ मध्ये पद वर्ग १, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीचा उल्लेख या परिशिष्टामध्ये करण्यात आला आहे.

४. पद वर्ग २ च्या सरळसेवा भरतीसाठी लेखी चाचणी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट — ब ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.
या परिशिष्ट — ब मध्ये पद वर्ग २, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीचा उल्लेख या परिशिष्टामध्ये करण्यात आला आहे.

५. पद वर्ग ३ च्या पदभरतीत लेखी आणि संगणकीय चाचणींसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट — क ( पृष्ठ क्र. १,२ आणि ३) जोडण्यात आले आहे.
या परिशिष्ट — क मध्ये पद वर्ग ३, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी व संगणकीय चाचणी परीक्षांचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत आणि मुलाखतीसाठी पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधीं या परिशिष्टामध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

६. पद वर्ग ४ च्या पदभरतीत लेखी चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत या संबधीचे विवरण नमुद असलेले परिशिष्ट — ड ( पृष्ठ क्र. १ आणि २) जोडण्यात आले आहे.
या परिशिष्ट — ड मध्ये पद वर्ग ४, प्रश्नपत्रिका क्रमांक, प्रश्नपत्रिका विभागनिहाय गुण, एकुण गुण, किमान पात्रता गुण, प्रश्नसंख्या, अभ्यासक्रम, प्रश्नाचे स्वरुप, प्रश्नपत्रिकेचे माध्यम आणि लेखी चाचणी परीक्षेचा कालावधी या संबधातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच उमेदवाराची मुलाखत व्यक्तिमत्व चाचणीद्वारे घेण्यात येईल व त्यास

गुणदान नसतील. सदर व्यक्तिमत्व चाचणी करीता पदनिहाय उमेदवार संख्या सुत्र या संबधी परिशिष्ट — ड मध्ये उल्लेख करण्यात आला आहे.

७. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — च (पृष्ठ क्र. १,२ आणि ३) मध्ये पद वर्ग १ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ, ब आणि क मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून विभाग ड — (१) आणि ड —(२) मधील प्रत्येक प्रश्नाला अनक्रमे पाच गुण आहेत. या चाचणीमध्ये पात्रता धारण करण्यासाठी ९० पैकी ४५ गुण प्राप्त करणे अनिवार्य मानण्यात आले आहे. या प्रश्नपत्रिकेमधील मराठी उताऱ्यावरील प्रश्न वगळता इतर प्रश्नांचे माध्यम इंग्रजी असेल.

८. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — छ (पृष्ठ क्र. १,२,३ आणि ४) मध्ये पद वर्ग २ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ,ब आणि क मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असून विभाग ड — (१) आणि ड —(२) मधील प्रश्नाला अनुक्रमे पाच गुण आहेत. या चाचणीमध्ये पात्रता धारण करण्यासाठी ९० पैकी ४५ गुण प्राप्त करणे अनिवार्य मानण्यात आले आहे. या प्रश्नपत्रिकेमधील मराठी उताऱ्यावरील प्रश्न वगळता इतर प्रश्नांचे माध्यम इंग्रजी असेल.

९. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — ज (पृष्ठ क्र. १,२, आणि ३) मध्ये पद वर्ग ३ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये दोन विभाग दर्शविण्यात आले असून पहील्या विभागात ५० व दुसऱ्या विभागात २० प्रश्न असतील सर्व प्रश्न अनिवार्य असतील. पहीला विभाग अ आणि दुसरा विभाग ब मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल. लेखी चाचणी परीक्षेत पात्र होण्यासाठी ७० पैकी ३५ गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. इंग्रजी भाषेशी निगडीत प्रश्न आणि गणिताशी निगडीत प्रश्नातील अंक वगळून प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल.

१०. या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — झ (पृष्ठ क्र. १ आणि २) मध्ये पद वर्ग ३ च्या संगणकीय चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये दोन विभाग दर्शविण्यात आले असून सर्व विभागातील प्रश्न अनिवार्य आहेत. विभाग अ आणि ब ला अनुक्रमे १० गुण असणार आहेत. या चाचणी परीक्षेमध्ये पात्रता धारण करण्यासाठी प्रत्येक विभागातील १० गुणापैकी ०५ गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. या प्रश्नपत्रिकेच्या अ विभागाचे माध्यम इंग्रजी आणि ब विभागाचे माध्यम मराठी असेल.

११.या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — ट (पृष्ठ क्र. १ आणि २) मध्ये पद वर्ग ४ च्या लेखी चाचणी परीक्षेसाठी नमुना प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली आहे. या प्रश्नपत्रिकेमध्ये तीन विभाग दर्शविण्यात आले असून विभाग अ मध्ये ५०, विभाग ब मध्ये २० आणि विभाग क — (१) मध्ये १० आणि विभाग क — (२) मध्ये १० प्रश्न असतील. सर्व प्रश्न अनिवार्य असतील. प्रत्येक विभागातील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल. या लेखी चाचणी परीक्षेत पात्र होण्यासाठी ९० पैकी किमान ४५ गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. इंग्रजी भाषेशी निगडीत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल.

१२.या सोबत जोडून असलेल्या परिशिष्ट — ठ (पृष्ठ क्र. १ ते ९ )मध्ये चाचणी परीक्षा पद वर्ग १,२,३ आणि ४ च्या भरती प्रक्रीयेसाठी प्रश्न अधिकोष तयार करणे, चाचणी परीक्षा घेणे, मुल्यमापन करणे, निकाल तयार करणे इ. साठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यासाठी मुख्य प्रभारी अधिकारी म्हणुन संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ हे असतील. या परीशिष्टामध्ये दर्शविण्यात आलेल्या तक्त्यात एकूण १३ प्रश्न अधिकोषांचे स्वरुप आणि व्याप्ती नमुद करण्यात आली असून सदर सर्व प्रश्न अधिकोष गोपनिय स्वरुपाचे असतील अशी तरतूद करण्यात आली आहे. प्रश्न अधिकोष तयार करण्यासाठी तक्त्यामध्ये नमुद असलेल्या तज्ञांकडून प्रारुप प्रश्न मागविण्यात येणार असून सदर प्रारुप प्रश्नांना नियमित केल्या जाण्यासाठी नियामक समितीच्या नियुक्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. नियामक समितीने प्रारुप प्रश्नांना नियमित केल्यानंतर सदर प्रश्नांना प्रश्न अधिकोषामध्ये प्रवेशित केल्या जाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. एक अथवा एकापेक्षा जास्त अधिकोषांमधून प्रत्येक प्रश्नपत्रिकेची योजना करण्यासाठी प्राश्निकाची नियुक्ती करण्यात येणार आहे. लेखी चाचणी परीक्षा आणि/अथवा संगणकीय चाचणी परीक्षांसाठी वितरीत करावयाच्या प्रश्नपत्रिकांची निवड करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेद्वारा नियुक्त केल्या जाणाऱ्या समितीची व्यवस्था करण्यात आली आहे. चाचणी परीक्षांचे मुल्यमापन संगणकाद्वारे केले जाणार असून दोन्ही चाचण्यांचे निकाल अनुसूचिमध्ये नमूद असलेल्या सुची आणि प्रतिसूचीमध्ये तयार करण्यात येतील. या परीशिष्टामध्ये नमूद असलेल्या पध्द्तीनुसार परीक्षार्थींना संगणकीय चाचणीसाठी आणि/अथवा मुलाखतीसाठी बोलावण्यात येणार आहे.

**सहपत्रे** :— परिशिष्ट अ,ब,क,ड,च,छ,ज,झ,ट आणि ठ.

स्थळ: गडचिरोली
दिनांक: २८/०८/२०१९

(डॉ.एन.व्ही.कल्याणकर)
कुलगुरू

परिशिष्ट — अ
(पृष्ठ क्र. १ आणि २)

## वर्ग १ च्या पदभरती लेखी चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत
### पद :— वर्ग १, लेखी चाचणी
### तक्ता

१

| अ. क्र. | पद वर्ग | प्रश्नपत्रिका क्रमांक | प्रश्नपत्रिका विभाग | विभाग निहाय गुण | एकूण गुण | किमान पात्रता गुण | प्रश्न संख्या | अभ्यासक्रम | प्रश्नांचे स्वरुप | माध्यम | चाचणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| १ | २ | १ | अ | ५० | ९० | ४५ | ५०* | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील 'तरतूदींवर' आधारीत. (इंग्रजी आवृत्ती) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | ९० मिनिटे |
| | | | ब | २० | | | २०* | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील 'कलम क्रमांकांवर' आधारीत. (इंग्रजी आवृत्ती) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | |
| | | | क | १० | | | १०* | बुध्दीमापन | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | |
| | | | ड (१) | ५ | | | ०१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील इंग्रजी उतारा. (इंग्रजी आवृत्ती) | उताऱ्यामधील ०५** रिकाम्या चौकटींमध्ये उताऱ्याखाली दिलेल्या अचूक शब्दाचा उताऱ्याच्या मजकुरानुसार 'अनुक्रमांक' नोंदविणे. | इंग्रजी | |
| | | | ड(२) | ५ | | | ०१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील मराठी उतारा. (मराठी आवृत्ती) | उताऱ्यामधील ०५** रिकाम्या चौकटींमध्ये उताऱ्याखाली दिलेल्या अचूक शब्दाचा उताऱ्याच्या मजकुरानुसार 'अनुक्रमांक' नोंदविणे. | मराठी | |
| | | | एकूण | ९० | ९० | ४५ | ८२ | | | | |

टिप :– मूल्यांकनासाठी नकारात्मक गुणदान पद्धतीचा अवलंब करण्यात येणार नाही.

* प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील.

** उताऱ्यामधील प्रत्येक मोकळीस एक गुण राहील.

*** परिक्षार्थींना लेखी चाचणीची उत्तरे '√' अशा चिन्हाने अथवा उताऱ्यामध्ये अनुक्रमांक नोंदविण्यासाठी काळ्या शाईच्या बॉलपेनचाच उपयोग करावा लागेल

पुढील पृष्ठावर निरंतर

**२. उमेदवाराची मुलाखत** :— लेखी चाचणीमध्ये पात्रता धारण केलेल्या उमेदवारास, खालील परिच्छेद ३ मध्ये नमूद असलेल्या सूत्रानुसार निवड समिती समोर मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. निवड समितीमधील प्रत्येक सदस्याला (अध्यक्षासहीत) प्रत्येक उमेदवाराची मुलाखत घेण्यासाठी १० गुणांमधून गुणदान करण्याचा अधिकार प्राप्त असेल. निवड समितीच्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या निवड समिती सदस्यांनी उमेदवारास गुणदान केल्यानंतर, उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या गुणदानांची उमेदवार निहाय बेरीज करण्यात येऊन सदर बेरीज संख्येला, उपस्थित असलेल्या सदस्य संख्येने विभाजीत केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या अंकाला (अपूर्णांकासह) सदर उमेदवाराचे गुण मानण्यात येतील. मुलाखतीमध्ये किमान ५ गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारास निवडीसाठी पात्र समजण्यात येऊन निवडीची गुणवत्ता यादी ठरविण्यासाठी उमेदवाराचे मुलाखतीमधील गुण, लेखी चाचणीमध्ये त्याने प्राप्त केलेल्या गुणांसोबत जोडण्यात येऊन गुण संख्येच्या आधारावर अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**३. मुलाखतीसाठी पदनिहाय—उमेदवार संख्या सूत्र** :—जाहिरात करण्यात आलेल्या पद संख्येच्या अनुषंगाने एका पदासाठी ०८, दोन पदांसाठी १०, तीन पदांसाठी १२, चार पदांसाठी १४ आणि पाच पदांसाठी १६ अशारितीने पुढील प्रत्येक वाढीव पदासाठी उमेदवारांच्या दोन वाढीव संख्येने उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

असे असले तरी वरील सूत्रात नमूद उमेदवार संख्येपक्षा कमी उमेदवार लेखी परीक्षेमध्ये पात्र ठरले असतील तर तेवढयाच उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांपैकी सूत्रानुसार बोलवावयाच्या उमेदवारांमधील शेवटच्या क्रमांकावरील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांइतकेच गुण अन्य उमेदवारांनी प्राप्त केले असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

———XX———

परिशिष्ट — ब
(पृष्ठ क्र. १ आणि २)

वर्ग २ च्या पदभरती लेखी चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत
पद :— वर्ग २ लेखी चाचणी
—तक्ता—

१

| अ. क्र. | पद वर्ग | प्रश्नपत्रिका क्रमांक | प्रश्नपत्रिका विभाग | विभाग निहाय गुण | एकूण गुण | किमान पात्रता गुण | प्रश्न संख्या | अभ्यासक्रम | प्रश्नाचे स्वरुप | माध्यम | चाचणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| १ | २ | २ | अ | ५० | | | ५०* | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या प्रकरण क्रमांक १,३,४,५,७,८,९,१०,१२ आणि १६ मधील 'तरतुदींवर' आधारीत. (इंग्रजी आवृत्ती) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | ९० मिनिटे |
| | | | ब | २० | | | २०* | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या प्रकरण क्रमांक १,३,४,५,७,८,९,१०,१२ आणि १६ मधील 'कलम क्रमांकावर' आधारीत. (इंग्रजी आवृत्ती) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | |
| | | | क | १० | | | १०* | बुध्दीमापन | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | |
| | | | ड (१) | ५ | ९० | ४५ | ०१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कोणत्याही प्रकरणामधील इंग्रजी उतारा. (इंग्रजी आवृत्ती) | उताऱ्यामधील ०५** रिकाम्या चौकटीमध्ये उताऱ्याखाली दिलेल्या अचूक शब्दाचा उताऱ्याच्या माध्यमानुसारचे 'अनुक्रमांक' नोंदविणे | इंग्रजी | |
| | | | ड (२) | ५ | | | ०१ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कोणत्याही प्रकरणामधील मराठी उतारा. (मराठी आवृत्ती) | उताऱ्यामधील ०५** रिकाम्या चौकटीमध्ये उताऱ्याखाली दिलेल्या अचूक शब्दाचा उताऱ्याच्या माध्यमानुसारचे 'अनुक्रमांक' नोंदविणे. | मराठी | |
| | | | एकूण | ९० | ९० | ४५ | ८२ | | | | |

टिप :— मूल्यांकनासाठी नकारात्मक गुणदान पध्दतीचा अवलंब करण्यात येणार नाही.

* प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील.

** उताऱ्यामधील प्रत्येक चौकटीला एक गुण राहील.

*** परिक्षार्थीला लेखी चाचणीची उत्तरे '√' अशा चिन्हाने अथवा उताऱ्यामध्ये अनुक्रमांक नोंदविण्यासाठी काळ्या शाईच्या बॉलपेनचाच उपयोग करावा लागेल. पुढील पृष्ठावर निरंतर

परिशिष्ट — क
(पृष्ठ क्र. १,२ आणि ३)

वर्ग ३ च्या पदभरती लेखी आणि संगणकीय चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना व मुलाखत
पद :- वर्ग ३ लेखी चाचणी.
नक्शा क्रमांक १

१

| अ. क्र. | पद वर्ग | प्रश्नपत्रिका क्रमांक | प्रश्नपत्रिका विभाग | विभाग निहाय गुण | एकूण गुण | किमान पात्रता गुण | प्रश्न संख्या | अभ्यासक्रम | प्रश्नांचे स्वरुप | माध्यम | चाचणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| १ | ३ | ३ | अ | ५० | ७० | ३५ | ५०* | १) मराठी :— भाषा, व्याकरण, प्रमाण लेखन आणि योग्य शब्दांचा वापर (१०गुण)<br>२) **English** :- Identification of correctly spelt words, words similar/opposite in meaning, completing the sentences using appropriate words (10 Marks)<br>३) सामान्य ज्ञान (१० गुण)<br>४) बुध्दीमापन (१० गुण)<br>५) गणित :— बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, अपूर्णांक, सरळरुप आणि टक्केवारी (१० गुण) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | मराठी<br>(इंग्रजी भाषाविषयक प्रश्न आणि गणित विषयाच्या प्रश्नातील अंक इंग्रजीत असतील.) | ७० मिनिटे |
| | | | ब | २० | | | २०* | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या प्रकरण क्रमांक ३,४,५,७,८,९ आणि १० मधील 'तरतुदी' आणि/ अथवा 'कलम क्रमांकावर' आधारीत. (मराठी आवृत्ती) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | मराठी | |
| | | | एकूण | ७० | ७० | ३५ | ७० | | | | |

टिप — मूल्यांकनासाठी नकारात्मक गुणदान पद्धतीचा अवलंब करण्यात येणार नाही
* प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील

*** परिक्षार्थीला लेखी चाचणीची उत्तरे '√' अशा निशाने नोंदविण्यासाठी काळ्या शाईच्या बॉलपेनचा उपयोग करावा लागेल.

पुढील पृष्ठावर नियत

पद :— वर्ग ३ संगणकीय चाचणी
तक्ता क्रमांक २

२

| अ. क्र. | पद वर्ग | प्रश्नपत्रिका क्रमांक | प्रश्नपत्रिका विभाग | विभाग निहाय गुण | एकूण गुण | किमान पात्रता गुण | प्रश्न संख्या | अभ्यासक्रम | प्रश्नांचे स्वरुप | माध्यम | चाचणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| १ | ३ | ४ | अ | १० | २० | ०५ | १ | **मराठी** :— टंकलेखन यंत्र पटलावरील विविध खुणा, चिन्हे, अंक आणि वर्णयुक्त १०* मराठी शब्द. | प्रात्यक्षिक | मराठी | ०५ मिनिटे |
| | | | ब | १० | | ०५ | १ | **इंग्रजी** :— टंकलेखन यंत्र पटलावरील विविध खुणा, चिन्हे, अंक आणि वर्णयुक्त १०* इंग्रजी शब्द. | प्रात्यक्षिक | इंग्रजी | |
| | | | एकूण | २० | २० | —— | २ | | | | |

टिपा :— १) मूल्यांकनासाठी नकारात्मक गुणदान पध्दतीचा अवलंब करण्यात येणार नाही.

२) लेखी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या एका पदासाठी १० उमेदवार, २ पदासाठी १५ उमेदवार, ३ पदासाठी २० उमेदवार, ४ पदासाठी २५ उमेदवार आणि ५ पदासाठी ३० उमेदवार अशा रितीने पुढील प्रत्येक वाढीव पदासाठी उमेदवारांच्या ५ वाढीव संख्येने उमेदवारांना या चाचणीसाठी बोलाविण्यात येईल.

३) संगणकांच्या उपलब्धतेनुसार लेखी परीक्षेतील पात्र उमेदवारांचे या चाचणीसाठी गट पाडण्यात येतील.

४) चाचणीची तारीख, वेळ आणि स्थळ प्रत्येक निमंत्रित करावयाच्या उमेदवाराला १० दिवस अगोदर कळविण्यात येईल.

पुढील पृष्ठावर सिरु

५) मराठी आणि इंग्रजी संगणकीय चाचणीमध्ये अनुक्रमे किमान पाच गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारास पात्र समजण्यात येईल असे असले तरी मुलाखतीसाठी बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या खाली नमूद सूत्राच्या अधिन असेल व त्यांना गुणवत्तेनुसार बोलविण्यात येईल.

६) संगणकीय चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी मुलाखत संपल्यानंतर जाहीर करण्यात येईल.

* विविध खुणा, चिन्हे, अंक आणि वर्णयुक्त प्रत्येक अचूक शब्दाला एक गुण राहील.

**३. उमेदवाराची मुलाखत** :— लेखी चाचणी आणि संगणकीय चाचणीमध्ये पात्रता धारण केलेल्या उमेदवारास, खालील परिच्छेद ४ मध्ये नमूद असलेल्या सूत्रानुसार निवड समिती समोर मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. निवड समितीमधील प्रत्येक सदस्याला (अध्यक्षासहीत) प्रत्येक उमेदवाराची मुलाखत घेण्यासाठी १० गुणांमधून गुणदान करण्याचा अधिकार प्राप्त असेल. निवड समितीच्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या निवड समिती सदस्यांनी उमेदवारास गुणदान केल्यानंतर, उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या गुणदानांची उमेदवार निहाय बेरीज करण्यात येऊन सदर बेरीज संख्येला, उपस्थित असलेल्या सदस्य संख्येने विभाजीत केल्यानंतर येणाऱ्या सरासरीच्या अंकाला (अपूर्णांकासह) सदर उमेदवाराचे गुण मानण्यात येतील. मुलाखतीमध्ये किमान ५ गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारास निवडीसाठी पात्र समजण्यात येऊन निवडीची गुणवत्ता यादी ठरविण्यासाठी उमेदवाराचे मुलाखतीमधील गुण, लेखी चाचणीमध्ये आणि संगणकीय चाचणीमध्ये त्याने प्राप्त केलेल्या गुणांसोबत जोडण्यात येऊन गुण संख्येच्या आधारावर अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**४. मुलाखतीसाठी पदनिहाय–उमेदवार संख्या सूत्र** :—जाहिरात करण्यात आलेल्या पद संख्येच्या अनुषंगाने संगणकीय चाचणीसाठी निर्धारित सूत्रानुसार बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार सदर चाचणीमध्ये पात्र ठरले असतील त्यांपैकी एका पदासाठी ०८, दोन पदांसाठी १०, तीन पदांसाठी १२, चार पदांसाठी १४ आणि पाच पदांसाठी १६ अशा रितीने पुढील प्रत्येक वाढीव पदासाठी उमेदवाराच्या दोन वाढीव संख्येने उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

असे असले तरी वरील सूत्रात नमूद उमेदवार संख्येपेक्षा कमी उमेदवार लेखी आणि संगणकीय चाचणीमध्ये पात्र ठरले असतील तर तेवढ्याच उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तसेच संगणकीय चाचणीत पात्र उमेदवारांपैकी सूत्रानुसार बोलवावयाच्या उमेदवारांमधील शेवटच्या क्रमांकावरील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांइतकेच गुण अन्य उमेदवारांनी प्राप्त केले असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

———XX———

परिशिष्ट — ड
(पृष्ठ क्र. १ आणि २)

वर्ग ४ च्या पदभरती लेखी चाचणीसाठी अभ्यासक्रम, परीक्षा योजना आणि मुलाखत
पद :— वर्ग ४, लेखी चाचणी.
तक्ता

१

| अ. क्र. | पद वर्ग | प्रश्नपत्रिका क्रमांक | प्रश्नपत्रिका विभाग | विभाग निहाय गुण | एकूण गुण | किमान पात्रता गुण | प्रश्न संख्या | अभ्यासक्रम | प्रश्नांचे स्वरुप | माध्यम | चाचणीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| १ | ४ | ५ | अ | ५० | ९० | ४५ | ५०* | सामान्य ज्ञान | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | मराठी | ९० मिनिटे |
| | | | ब | २० | | | २०* | बुध्दीमापन | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | | |
| | | | क (१) | १० | | | १०* | मराठी :— समानार्थी, विरुध्दार्थी शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | | |
| | | | क (२) | १० | | | १०* | Identification of correctly spelt word, completing sentences using appropriate words. | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी | इंग्रजी | |
| | | | एकूण | ९० | ९० | ४५ | ९० | | | | |

टिपा :— मुल्यांकनासाठी नकारात्मक गुणदान पध्दतीचा अवलंब करण्यात येणार नाही.

* प्रत्येक प्रश्नाला एक गुण राहील.

*** परिक्षार्थीला लेखी चाचणीची उत्तरे '√' अशा चिन्हाने नोंदविण्यासाठी काळया शाईच्या बॉलपेनचाच उपयोग करावा लागेल.

पुढील पृष्ठावर निरंतर

परिशिष्ट — ड (निरंतर)

२. **उमेदवाराची मुलाखत** :— लेखी चाचणी मध्ये पात्रता धारण केलेल्या उमेदवारास खालील परिच्छेद ३ मध्ये नमुद असलेल्या सुत्रानुसार निवड समिती समोर व्यक्तिमत्व चाचणीद्वारे मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. सदर व्यक्तिमत्व चाचणीस गुणदान नसतील. उमेदवार निवडीची गुणवत्ता यादी ठरविण्यासाठी त्याचे लेखी चाचणी मधील गुण व व्यक्तिमत्व चाचणी च्या आधारावर अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

३. **मुलाखतीसाठी पदनिहाय — उमेदवार संख्या सुत्र** :— जाहिरात करण्यात आलेल्या पद संख्येच्या अनुषंगाने जे उमेदवार लेखी चाचणीमध्ये पात्र ठरले असतील त्यापैकी एक पदासाठी ०८, दोन पदासाठी १०, तीन पदासाठी १२, चार पदासाठी १४ आणि पाच पदासाठी १६ अशा रितीने पुढील प्रत्येक वाढीव पदासाठी उमेदवारांच्या दोन वाढीव संख्येने उमेदवारांना व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

असे असले तरी वरील सुत्रात नमुद उमेदवार संख्येपेक्षा कमी उमेदवार लेखी परिक्षेमध्ये पात्र ठरले असतील तर तेवढयाच उमेदवारांन व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलविण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारापैकी सुत्रानुसार बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारामधील शेवटाच्या क्रमांकावरील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणाइतकेच गुण अन्य उमेदवारांनी प्राप्त केले असतील तर अशा सर्व उमेदवारांना व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलविण्यात येईल.

परिशिष्ट - 'च'

(पृष्ठ क्र. १,२ आणि ३)

(Pattern of question paper)

# Gondwana University, Gadchiroli

**Question Paper No. 1**

Roll Number :

## Test :- Post Class - I

**Time :-** 90 Minutes

Total Marks :- 90

**Notes:-**

1) There are four sections in the question paper.
2) All questions are compulsory.
3) Each question in sections 'A' , 'B' and 'C' shall have one mark and each question in section D-I & D-II shall have 5 Marks.
4) Qualifying marks shall be 45 out of 90 Marks.
5) Medium of question paper is English, (excluding Marathi passage under section -D- II.)

**Section -'A'**

**Marks :** 50.

**Instuructions :** 1) All questions are based on the 'provisions' of The Maharashtra Public Universities Act, 2016 (English Edition) (hereinafter referred to as 'The Act')

2) Candidate shall have to put sign '√' in the square of correct answer.

Q.1 : Who shall be the appointing authority for the officer of the University of the rank of Assistant Registrar?

☐ ----Registrar, ☐ ----- Chancellor,

☐ ----Pro-Vice-Chancellor, ☐√ ------Vice-Chancellor.

**To**

Q. 50 : --------------------------------------- ?

☐ -------, ☐√ ------, ☐ -----, ☐ ------.

**Continued on next page**

**Section –'B'** **Marks : 20.**

**Instructions :** 1) All questions are based on 'section numbers' of The Maharashtra Public Universities Act, 2016. (English Edition) (hereinafter referred to as 'The Act')

2) Candidate shall have to put the sign '√' in the square of correct answer.

Q. 1 : Which section of the Act has provided the definition of Teacher?

☐ ----2 (60), ☑ √ ----2(61), ☐ ----2(62) , ☐ ----2(63).

**To**

Q. 20 : ---------------------------------------- ?

☐ -----, ☐ -----, ☑ √ ----, ☐ ----.

Intelligence test

Section – 'C' Mark: 10

**Instruction :** Candidate shall have to put the sign '√' in the square of correct answer.

Q.1 At a conference, 12 members shook hands with each other before and after the meeting, How many total number of hadshakes occurred ?

☐ - 100 ☑ ✓ - 132 ☐ - 145 ☐ - 144

**To**

**Q.10** ---------------------------------------------------------?

☐ - ☐ - ☐ - ☑ ✓ -

**Continued on next page**

## Section –'D-I'

**Marks :** 05.

**Instructions :** 1) Following English passage is provided from The Maharashtra Public Universities Act, 2016 (English Edition).

2) Candidate shall have to put 'number' of correct word, which is provided below the passage, in the blank square of the passage.

Q. 1 : " Each University shall be competent to acquire and [ 2 ] property, both movable and [ 5 ] to lease, sell or otherwise transfer [ 3 ] of any movable and immovable property, which may vest in or be [ 4 ] by it for the purposes of the university, and to contract and do all other things [ 1 ] for the purposes of this Act."

1. necessary
2. hold
3. dispose
4. acquired
5. immovable

## Section –'D - II'

**Marks :** 05.

**सूचना :** १) खालील मराठी उतारा 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६' च्या मराठी आवृत्तीमधील आहे.

२) उताऱ्यामध्ये प्रदान करण्यात आलेल्या रिकाम्या चौकटीत उमेदवाराने उताऱ्याखाली पुरविण्यात आलेल्या अचूक शब्दाचा 'अनुक्रमांक' नोंदवावयाचा आहे.

प्रश्न १."कुलगुरु म्हणुन [ ५ ] करण्यात आलेली व्यक्ती ही, [ २ ] संविदेच्या अटी व शर्तीना अधिन राहून तीने अधिकार पद [ १ ] केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाचा अवधी किंवा तिच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यतचा अवधी या दोन्हीपैकी जो [ ४ ] अवधी अगोदर पूर्ण होईल त्या अवधीसाठी पद [ ३ ] करील, आणि ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.''

१. ग्रहण
२. सेवाविषयक
३. धारण
४. कोणताही
५. नियुक्ती

..................................

परिशिष्ट . 'छ'

(पृष्ठ क्र. १,२,३ आणि ४)
(Pattern of question paper)

# Gondwana University, Gadchiroli

**Question Paper No. 2** Roll Number :

**Test :- Post Class - II**

**Time :-** 90 Minutes **Total Marks** :- 90

**Notes:-**

1) There are four sections in the question paper.
2) All questions are compulsory.
3) Each question in sections 'A','B' and 'C' shall have one mark and each question in section D-I & D-II shall have 5 Marks.
4) Qualifying marks shall be 45 out of 90 Marks.
5) Medium of question paper is English, (excluding Marathi passage under section -D- II.)

**Section -'A'** **Marks :** 50.

Instructions : 1) All questions are based on the 'provisions' of The Maharashtra Public Universities Act, 2016 (English Edition) (hereinafter referred to as 'The Act')

2) Candidate shall have to put sign '√' in the square of correct answer.

**Continued on next page**

Q.1 : Who shall be the appointing authority for the officer of the University of the rank of Assistant Registrar?

☐ ----Registrar, ☐ ---- Chancellor,

☐ ----Pro-Vice-Chancellor, ☐ √ ----Vice-Chancellor.

**To**

Q. 50 : ---------------------------------------- ?

☐ ----, ☐ √ ----, ☐ ----, ☐ ----.

**Section –'B'** **Marks :** 20.

**Instructions:** 1) All questions are based on the 'section numbers' of The Maharashtra Public Universities Act, 2016.(hereinafter referred to as 'The Act'.)

2) Candidate shall have to put the sign '√' in the square of correct answer.

Q. 1 : Under which section is the Vice-Chancellor appointing and disciplinary authority for the university teahcers?

☐ ----12 (8), ☐ √ ----12(9) , ☐ ----12(10), ☐ ---12 (11).

**To**

Q. 20 : ---------------------------------------- ?

☐ -----, ☐ ----, ☐ ----, ☐ -----.

Continued on next page

**Section –'C'** **Marks : 10.**

Intelligence Test

**Instructions:** Candidate shall have to put the sign '√' in the square of correct answer.

Q. 1 : The day after the day after tomorrow is four days before Monday. What day is it today?

[√] Monday [ ] Thuesday [ ] Wednesday [ ] Thursday

**To**

Q. 10 : ---------------------------------------- ?

[ ] -----, [ ] ----, [√] ----, [ ] -----.

**Section –'D-I'** **Marks : 05.**

Instructions : 1) Following English passage is provided from The Maharashtra Public Universities Act, 2016 (English Edition).

2) Candidate shall have to put 'number' of correct word, which is provided below the passage, in the blank square of the passage.

Q. 1 : " Each University shall be competent to acquire and [2] property, both movable and [5] ,to lease, sell or otherwise transfer or [3] of any movable or immovable property, which may vest in or be [4] by it for the purposes of the University, and to contract and do all other things [1] for the purposes of this Act."

Continued on next page

1. necessary
2. hold
3. dispose
4. acquired
5. immovable

**Section –'D - II'** **Marks** : 05.

**सूचना** : १) खालील मराठी उतारा 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६' च्या मराठी आवृत्तीमधील आहे.

२) उताऱ्यामध्ये प्रदान करण्यात आलेल्या रिकाम्या चौकटीत उमेदवाराने उताऱ्याखाली पुरविण्यात आलेल्या अचूक शब्दाचा 'अनुक्रमांक' नोंदवावयाचा आहे.

प्रश्न १."कुलगुरु म्हणुन [ ५ ] करण्यात आलेली व्यक्ती ही, [ २ ] संविदेच्या अटी व शर्तींना अधिन राहून तीने अधिकार पद [ १ ] केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाचा अवधी किंवा तिच्या वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंतचा अवधी या दोन्हीपैकी जो [ ४ ] अवधी अगोदर पूर्ण होईल त्या अवधीसाठी पद [ ३ ] करील, आणि ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही."

१. ग्रहण
२. सेवाविषयक
३. धारण
४. कोणताही
५. नियुक्ती

---

परिशिष्ट - 'ज'
(पृष्ठ क्र. १,२ आणि ३)
(प्रश्नपत्रिकेचा नमुना)

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रश्नपत्रिका क्रमांक ३ रोल नंबर :

चाचणी : पद वर्ग — ३

वेळ :— ७० मिनिटे एकूण गुण :— ७०

---

टिपा :—

१) प्रश्नपत्रिकेचे दोन विभाग असतील. पहिल्या विभागात ५० व दुसऱ्या विभागात २० प्रश्न असतील.

२) सर्व प्रश्न अनिवार्य असतील .

३) विभाग अ व ब मधील प्रत्येक प्रश्नाला एक गुण असेल.

४) चाचणी परीक्षेत पात्र होण्यासाठी किमान ३५ गुण अनिवार्य असतील.

५) इंग्रजी भाषेशी निगडीत प्रश्न आणि गणिताशी निगडीत प्रश्नातील अंक वगळून, प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल.

---

विभाग :— 'अ' गुण :— ५०

सूचना :— १) प्रश्न क्रमांक १ ते १० :— मराठी.

२) प्रश्न क्रमांक ११ ते २० :— English.

३) प्रश्न क्रमांक २१ ते ३० :— सामान्यज्ञान.

४) प्रश्न क्रमांक ३१ ते ४० :— बुध्दीमापन.

५) प्रश्न क्रमांक ४१ ते ५० :— गणित.

६) अचूक पर्याया समोरील चौकटीत '√' अशी खुण करावयाची आहे.

## विभाग — अ

## मराठी

प्रश्न १. नामाऐवजी वापरल्या जाणाऱ्या विकारी शब्दाला काय म्हणतात ?

